# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)**

**सभा व दप्तर कक्ष**

---

ज्ञानगंगा घरोघरी

# विद्वत परिषद बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 70 |
| स्थळ | : | **यश इन सभागृह (Offline/Online)** |
| दिनांक | : | मंगळवार 03 फेब्रुवारी, 2026 |
| वेळ | : | दुपारी 2 : 30 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

## 70वी विद्वत मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत परिषदेची 70 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने मंगळवार, दि. 03 फेब्रुवारी 2026 रोजी दुपारी 2.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू **आणि** संचालक, बहुविद्याशाखीय विद्याशाखा | सदस्य |
| 03 | मा. डॉ. राजेंद्र विखे पाटील, अध्यक्ष व कुलपती, प्रवरा मेडिकल सायन्स संस्था मु.पो. लोणी, ता. रहाता. जि. अहिल्यानगर | सदस्य |
| 04 | मा. श्री. मधुकर गवळी, मु.पो. उगाव, ता. निफाड. जि. नाशिक | ऑनलाईन उपस्थित |
| 05 | मा. डॉ. संजय तांबट, पुणे | ऑनलाईन उपस्थित |
| 06 | मा. डॉ. संजय चाकणे, पुणे | ऑनलाईन उपस्थित |
| 07 | मा. डॉ. जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा **आणि** मा. प्र. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास विद्याशाखा | सदस्य |
| 08 | मा. डॉ. संजीवनी महाले, मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 09 | मा. डॉ. माधुरी सोनवणे, संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 10 | मा. डॉ. चेतना कामळसकर, मा. प्र. संचालक, विज्ञान विद्याशाखा आणि प्र. संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 11 | मा. डॉ. सुरेंद्र पाटोळे, मा. प्र. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 12 | मा. श्री. नागार्जुन वाडेकर मा. प्र. संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा **आणि** प्र. संचालक, भाषा साहित्य व सांस्कृतिक अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| 13 | मा. श्री. राजेंद्र वाघ, सहयोगी प्राध्यापक, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 14 | मा. डॉ. दयाराम पवार, प्रमुख विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र | सदस्य |
| 15 | मा. डॉ. लतिका गायकवाड, सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 16 | मा. डॉ. प्रकाश बर्वे, उपग्रंथपाल व प्र. प्रमुख, ज्ञानस्रोत केंद्र | ऑनलाईन उपस्थित |
| 17 | मा. डॉ. नितीन ठोके, कृषी विज्ञान केंद्र | सदस्य |
| 18 | डॉ. मधुकर शेवाळे, प्र. संचालक, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन कक्ष **आणि** नियोजन व सुसुत्रीकरण केंद्र | सदस्य |
| 19 | मा. श्री. गणेश लोखंडे, प्र. संचालक, ऑनलाईन एज्युकेशन विद्याशाखा आणि मा. प्र. संचालक, विकासात्मक अध्ययन विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 20 | मा. प्रा. डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | निमंत्रितसदस्य |
| 21 | मा. प्रा. डॉ. सज्जन थूल, प्र.संचालक, मूल्यमापन विभाग | निमंत्रित सदस्य |
| 22 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग | निमंत्रित सदस्य |
| 23 | मा. प्र.संचालक, ग्रामीण विकास उद्योजकता विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 24 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, कुलसचिव (प्र.) | सदस्य-सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. डॉ. अजय भामरे, प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. डॉ. धनंजय बेळे, नाशिक | सदस्य |
| 03 | मा. श्री. राजेश पांडे, शिवाजी नगर, पुणे | सदस्य |
| 04 | मा. श्री. संजय वझे, कल्याण (प), जि. ठाणे | सदस्य |
| 05 | मा. श्री. महेश दाबक, आनंदनगर, नाशिक | सदस्य |
| 06 | मा. श्री. विलास विष्णू शिंदे, आडगाव नाशिक | सदस्य |
| 07 | मा. श्री. दत्ता पाटील | निमंत्रित सदस्य |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

---

## 70वी विद्वत परिषद बैठक

## कार्यवृत्त

**मंगळवार 03.02.2026** **दुपारी 2:30 वाजता**

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 70.1.0 | | बैठकीसाठी उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत<br><br>प्रत्यक्ष उपस्थित व ऑनलाईन उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे विद्वत परिषदेचे सदस्य सचिवांनी स्वागत केले. |
| 70.2.0 | 70.2.1 | दि. 08 नोव्हेंबर 2025 रोजी झालेल्या 69 व्या विद्वत परिषद बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.<br><br>दि. 08 नोव्हेंबर 2025 रोजी झालेल्या 69 व्या विद्वत परिषद बैठकीच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा होऊन सर्व सन्माननीय सदस्यांनी इतिवृत्तास मान्यता प्रदान केली. |
| | 70.2.2 | दि. 08 नोव्हेंबर 2025 रोजी झालेल्या 69 व्या विद्वत परिषद बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल वाचून कायम करणे.<br><br>दि. 08 नोव्हेंबर 2025 रोजी झालेल्या 69 व्या विद्वत परिषद बैठकीच्या निर्णयावरील कार्यवाहीच्या अहवालाचे अवलोकन केले त्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| 70.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 70.3.1<br>परीक्षा विभाग | **विद्यापीठाच्या एकतीसावा दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदव्या व पदविकांना मान्यता मिळणेबाबत...**<br>**टिपणी** — विद्यापीठाचा 31 वा दीक्षांत समारंभ दि. 4 फेब्रुवारी, 2026 रोजी विद्यापीठाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेला आहे. या दीक्षांत समारंभात विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या माहे जानेवारी 2025, माहे मार्च 2025 व मे/जून 2025 या परीक्षांमध्ये पात्र विद्यार्थ्यांना पदवी, पदविका, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदव्या व संशोधन पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत. |

| Sr. No. | Details | Total Degree/Diploma to be awarded in 31st Convocation |
|---|---|---|
| 01 | Diploma | 12,637 |
| 02 | Degree | 90,708 |
| 03 | PG Degree | 20,571 |
| 04 | Ph.D. | 05 |
| | | 1,23,921 |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना पदव्या व पदविका प्रदान करण्यासाठीचा प्रस्ताव मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**ठराव** — विद्यापीठाच्या 31 व्या दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या विविध शिक्षणक्रमांच्या माहे जानेवारी 2025, मार्च 2025 व मे/जून 2025 परीक्षांमध्ये पात्र विद्यार्थ्यांना पदवी, पदविका, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदव्या व संशोधनातील विद्यावाचस्पती (Ph.D.) पदव्यांची सांख्यिकीय माहिती परीक्षा नियंत्रकांनी सादरीकरणाद्वारे मा. विद्वत परिषदेसमोर विशद केली.<br>या समारंभात प्रामुख्याने स्त्री- पुरुष वर्ग व वयानुसार 60 वर्षांवरील 208 विद्यार्थी, 68 कैदी बांधव व 77 दृष्टिहीन विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे.<br>दीक्षांत समारंभानंतर विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येणारी पदवी व पदविका प्रमाणपत्रे वैशिष्ट्यपूर्ण असून त्यावर 12 अंकी APAAR ID/ABC ID अंकित केलेला आहे तसेच प्रमाणपत्रावर Block Chain वर आधारित QR Code छापलेला असून, तो स्कॅन करून प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करता येऊ शकेल. यामुळे पडताळणी प्रक्रियेसाठी लागणाऱ्या वेळेची बचत होणार आहे.<br>NAD अंतर्गत DigiLocker पोर्टलवर पदवी / पदविका प्रमाणपत्राची डिजिटल ई-कॉपी दीक्षांत समारंभ संपल्यानंतर तत्काळ उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच DigiLocker पोर्टल व्यतिरिक्त पदवी / पदविका प्रमाणपत्राची डिजिटल कॉपी 'ई-सुविधा' मोबाईल ॲपमध्ये कायमस्वरूपी उपलब्ध राहील.<br>मुळ प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना नेहमीच्या विहित पद्धतीनुसार पाठविण्यात येईल.<br>परीक्षा विभागाकडून डिजिटल पद्धतीने दिल्या जाणाऱ्या उपक्रमांबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी परीक्षा नियंत्रक व परीक्षा विभागाचे अभिनंदन केले.<br>मा. विद्वत परिषदेने सदर प्रस्तावास मान्यता देऊन सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव ठेवावा या शिफारशीसह सर्वानुमते ठराव केला. सदर ठराव याच सभेत वाचून याच सभेत कायम करण्यात आला. |
| | 70.3.2<br>परीक्षा विभाग | **विशेष स्तर (Specialization) नसलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रावर कला स्नातक (सामान्यस्तर) / Bachelor of Arts (General) असा उल्लेख करून पदवी प्रदान करणेबाबत...**<br><br>**टिपणी** — विशेषस्तर (Specialization) नसलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रावर कला स्नातक (सामान्यस्तर)/Bachelor of Arts (General) असा उल्लेख करून पदवी प्रदान करण्यासंदर्भातील विषय विद्वत परिषदेकडे सादर करण्याबाबत दि. 09 डिसेंबर, 2025 रोजी झालेल्या 58 व्या परीक्षा मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. 58.4.02 नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. सदरचा विषय विद्वत परिषद मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...<br><br>**ठराव** — विशेषस्तर (Specialization) नसलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रावर कला स्नातक (सामान्यस्तर)/Bachelor of Arts (General) असा उल्लेख करून पदवी प्रदान करण्यासंदर्भात परीक्षा मंडळाच्या दि. 09 डिसेंबर, 2025 रोजी झालेल्या 58 व्या बैठकीतील ठराव क्र. 58.4.02 नुसार केलेल्या शिफारशीस सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |

| | | |
|---|---|---|
| | 70.3.3<br>डिजिटल एज्युकेशन विद्याशाखा | **स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन विद्याशाखा परिषदेची बैठक दिनांक 26 डिसेंबर, 2025 रोजी आयोजित विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर.**<br>**टिपणी** — स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन विद्याशाखा परिषदेची बैठक दिनांक 26 डिसेंबर, 2025 रोजी आयोजित विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**ठराव** — स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन विद्याशाखा संचालकांनी विद्याशाखा परिषदेतील इतिवृत्ताविषयी थोडक्यात माहिती विषद केली.<br>1. सायबर सिक्युरिटी ऑडिट अभ्यासक्रम प्रत्येक पदवी तसेच पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांमध्ये समाविष्ट करावा. त्याचे शुल्क रु. 500.00 न ठेवता रुपये 120.00 करावे.<br>2. मूल्य शिक्षणाची मूलतत्वे मुलभूत या प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे सध्याचे शुल्क रु. 3060.00 न ठेवता सुधारून ते रु. 1600.00 करावे.<br>3. MOOC अभ्यासक्रम निर्मितीसाठी विषयतज्ज्ञ आणि कोर्स क्रिएटर यांना मानधन देण्यात यावे.<br>विद्याशाखेच्या वरील तीनही मुद्यांना विद्वत परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. तसेच मुद्दा क्रमांक 3साठी द्यावयाचे मानधन हे केवळ विद्यापीठाबाहेरील विषयतज्ज्ञ व कोर्स क्रिएटर यांना देण्यात यावे अशी दुरुस्ती सुचविण्यात आली. तसेच उर्वरित इतिवत्तास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 70.3.4<br>संगणकशास्त्र विद्याशाखा | **संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेची बैठक दिनांक 19 जानेवारी, 2026 रोजी आयोजित विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेची बैठक दिनांक 19 जानेवारी, 2026 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** — दिनांक 19 जानेवारी 2026 रोजी झालेल्या संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तातील सर्व विषयांस माननीय विद्वत परिषदेने सर्वानुमते मान्यता दिली आहे. त्यात इतर मान्यतांबरोबरच पुढील बाबींचाही समावेश आहे.<br><br>संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेने मान्य केलेल्या अभ्यासकेंद्र पुनर्मान्यता व नव्याने मान्यतेच्या नियमावलीला, तसेच BCA, MCA, B.Sc. (Industrial Automation) या शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमाच्या अध्ययन साहित्य विकासनासाठी तज्ज्ञांच्या यादीला, आणि B.Sc. (Industrial Automation) या शिक्षणक्रमासाठी अप्रेंटिसशिप देण्यास तयार असलेल्या नाशिक मधील इंडस्ट्रीजच्या यादीला मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.<br><br>मा. कुलगुरूंनी मांडलेल्या सूचनेनुसार असाही ठराव करण्यात आला की सदर इंडस्ट्रीज व्यतिरिक्त आणखी काही ऑटोमेशन इंडस्ट्रीज या शिक्षणक्रमाच्या |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशिप देण्यास तयार असतील तर स्कूल कौन्सिलच्या मान्यतेने अशा इंडस्ट्रीजचाही या यादीत समावेश करण्यात यावा व त्यास माननीय कुलगुरूंची स्वीकृती घेण्यात यावी. या सूचनेस सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 70.3.5<br>कृषी विज्ञान विद्याशाखा | **कृषी विज्ञान विद्याशाखा परिषदेची बैठक दि. 12 जानेवारी, 2026 रोजी आयोजित विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....**<br><br>**टिपणी** — कृषी विज्ञान विद्याशाखा परिषदेची बैठक दिनांक 12 जानेवारी, 2026 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>**ठराव** — कृषी विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या पुढील सर्व ठरावांना<br>1. कृषी शिक्षणक्रमांच्या संमंत्रकांच्या यादीला संमंत्रक, प्राश्निक, परीक्षक, समीक्षक, इत्यादी कार्यासाठी मान्यता देण्यात आली.<br>2. रेशीम उत्पादन प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रमाच्या Programme Advisory Committee ला मान्यता तसेच रेशीम उत्पादन प्रमाणपत्र व पदविका यांच्यासाठी लेखक व संपादकांना मान्यता, आणि विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार या शिक्षणक्रमांसाठी Concept Note, Prgramme Structure, Credit Distribution, PPF, PPR, PDF, Detailed Syllabus, Evaluation Pattern, या अभ्यासकेंद्रांची पात्रता नियम, अभ्यासकेंद्र मान्यतांसाठी शुल्क, संमंत्रकांची शैक्षणिक अर्हता, या शिक्षणक्रमासाठीची शुल्करचना तसेच या विद्याशाखेने मान्य केलेल्या ठरावांना मान्यता प्रदान करण्यात आली.<br>3. श्वान पालक प्रबोधन प्रमाणपत्र आणि माती विना शेती या शिक्षणक्रमांच्या सुधारित शुल्क रचनेस मान्यता प्रदान करण्यात आली.<br>4. गोड्या पाण्यातील मत्स्यपालन प्रमाणपत्र शिक्षणक्रम शुल्करचना तसेच अभ्यासकेंद्र तपासणी सुधारीत शुल्काच्या ठरावांना मान्यता प्रदान करण्यात आली.<br>सर्व सन्माननीय सदस्यांकडून मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 70.3.6<br>बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | **बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेमार्फत एम.ए. हिंदू स्टडीज् या शिक्षणक्रमाचा आराखडा व त्यामधील घटक मा. विद्वत परिषदेसमोर सादर....**<br><br>**टिपणी** - बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या एम.ए. हिंदू स्टडिज् हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्यास विद्याशाखा परिषद व विद्वत परिषद यांचेकडून मान्यता प्राप्त झालेली आहे. या शिक्षणक्रम विकसन अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रम आराखडा व त्यामधील घटक यांचेकरिता मा. कुलगुरू यांनी मान्यता दिलेली आहे. सदरचा विषय मा. विद्वत परिषदेसमोर सादर....<br><br>**ठराव** — बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा परिषदेने मान्य केलेल्या एम.ए. हिंदू स्टडिज् या दोन वर्ष (चार सत्राच्या) श्रेयांकांनुसारच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | तसेच Community Engagement अंतर्गत समाजाची गरज लक्षात घेऊन 'पोलिस मित्र' आणि 'नाशिक धार्मिक पर्यटन' हे दोन प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू करण्यास सर्व सन्माननीय सदस्यांकडून मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 70.3.7<br>भाषा अनुवाद केंद्र | **'अनुवाद प्रमाणपत्र' हा शिक्षणक्रम सुरू करणेबाबतचा प्रस्ताव मा. विद्वत परिषदेसमोर सादर...**<br><br>**टिपणी** – 'अनुवाद प्रमाणपत्र' या शिक्षणक्रम निश्चितीसाठी संगठीत केलेल्या विशेष समितीची बैठक शुक्रवार, दि. 16 जानेवारी, 2026 रोजी आयोजित करण्यात आली होती. समितीने सर्वंकष विचार करून एकूण 44 श्रेयांकाचा तपशीलवार अभ्यासक्रम तयार केला आहे. या अभ्यासक्रमाचा तपशील अवलोकनार्थ जोडला आहे. 'अनुवाद प्रमाणपत्र' शिक्षणक्रम आगामी विद्वत परिषदेसमोर चर्चेसाठी व मान्यतेसाठी सादर...<br><br>**ठराव** – 'अनुवाद प्रमाणपत्र' या शिक्षणक्रमाच्या निश्चितीसाठी संगठीत केलेल्या विशेष समितीने तयार केलेल्या 44 श्रेयांकांच्या आराखड्यास व 'अनुवाद प्रमाणपत्र' शिक्षणक्रमास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली.<br>या शिक्षणक्रमाच्या प्रवर्तनाचे / कार्यवाहीचे तपशील भाषा अनुवाद केद्राने पुढील बैठकीत सादर करण्याची सूचना करण्यात आली. |
| | 70.3.8<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **दि. 22 जानेवारी, 2026 रोजी आयोजित शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. 67 बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** - शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची बैठक क्र. ६७ दि. २२/०१/२०२६ रोजी सकाळी 11.30 वा. Offline आणि Online पध्दतीने आयोजित केली होती. सदरच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 67 चे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>**ठराव** – शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालकांनी विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तातील ठळक बाबींचे अवलोकन करून दिले.<br>1. पीएच.डी. शिक्षणक्रम शिक्षणशास्त्र आणि दूरशिक्षणमध्ये सुरू करण्यास मान्यता.<br>2. सेवांतर्गत बी.एड. (P80) शिक्षणक्रम संरचना व PPR व शिक्षणक्रम पूर्ण करण्याचा कालावधी यांना मान्यता<br>3. सेवांतर्गत बी.एड. व विशेष बी.एड. या शिक्षणक्रमातील SEBC प्रवर्गातील प्रवेशासाठी नॉन क्रिमीलिअर दाखला लागू करण्यास मान्यता<br>4. बी.ए. शिक्षणक्रमासाठी 'विदूर' संवर्गासाठी अतिरिक्त 2 गुण देण्याच्या विषयाबाबत मा. कुलगुरूंनी शासनाच्या नियमांचे पालन करावे असे सुचित केले.<br>5. बी.एड. प्रवेशासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठा व्यतिरिक्त पण UGC मान्यताप्राप्त विद्यापीठातील पीएचडी प्राप्त प्रवेशार्थींना अतिरिक्त गुणांना मान्यता<br>6. सेवांतर्गत बी.एड. व विशेष बी.एड. शिक्षणक्रमांच्या प्रवेशासाठीच्या सॉफ्टवेअर विकसनास मान्यता |

| | | |
|---|---|---|
| | | 7. सेवांतर्गत बी.एड. व विशेष बी.एड. शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्र बदलास मान्यता<br>8. प्रथम फाऊंडेशन आणि श्री. वसंत ठकार फाऊंडेशन यांच्याशी करावयाच्या सामंजस्य करारास मान्यता<br>9. एम.ए. शिक्षणशास्त्र पुनर्रचना अभ्यासक्रम निहाय पाठ्यक्रम विकसन समितीस मान्यता.<br>10. NCTE, Regulations-2014 नुसार बी.एड. शिक्षणक्रमासाठी किमान कालावधी २ वर्ष व कमाल कालावधी ५ वर्ष ठेवण्यास मान्यता.<br>11. RCI Regulations-2015 नुसार बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम प्रवेश कालावधी किमान २.५ वर्ष आणि कमाल कालावधी ५ वर्ष ठेवण्यास मान्यता<br>12. बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमासाठीचे प्रवेश हे प्रवेश पूर्व चाचणीद्वारे घेण्यास आणि प्रवेशार्थीला एकापेक्षा जास्त अभ्यासकेंद्रावर प्रवेश घ्यावयाचा असल्यास Software मध्ये प्राधान्यक्रम देण्याची सुविधा देणेबाबत मान्यता.<br>13. बी.एड. विशेष शिक्षण पुनर्रविकसन शिक्षणक्रमातील विविध अभ्यासक्रमांसाठी पाठ्यक्रम विकसन समितीस मान्यता.<br>14. Certificate Program Cross Disability, Early Intervention for Inclusive Education या शिक्षणक्रमाच्या लेखक व संपादकांच्या नावांना मान्यता.<br>15. बी.एड. सेवांतर्गत (P80) व बी.एड. विशेष (P21) शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्र बदलाबाबत मा.कुलगुरूंची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी यास मान्यता.<br>16. सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी बी.एड. सेवांतर्गत (P80) शिक्षणक्रम आणि शालेय व्यवस्थापन पदविका [DSM] (P10) च्या प्रात्यक्षिक कार्याची मौखिक परीक्षा घेण्यासाठी बहिस्थ परीक्षकांची नावे संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांच्या मान्यतेने कळविण्यास मान्यता<br>17. बी.एड. सेवांतर्गत (P80), बी. एड. विशेष (P21) आणि शालेय व्यवस्थापन पदविका [DSM] (P10) शिक्षणक्रमासाठी CAचे गुण भरण्यासाठी विद्याशाखेने केलेल्या नियमास मान्यता तसेच MKCL Software मध्ये बदल न करता संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा ह्यांनी मा. कुलगुरूंची मान्यता घेऊन Offline पद्धतीने अंतर्गत गुणांची नोंद करण्यात यावी यास मान्यता.<br>18. शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत परसबाग प्रमाणपत्र शिक्षणक्रम Offline पद्धतीने तसेच School of Digital Education आणि शिक्षणशास्त्र विद्याशाखा ह्यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन पद्धतीने राबविण्यास मान्यता<br>19. डिझाईन थिंकिंगच्या आधारे उद्योजकता विकास (Design thinking for Entrepreneurship Development) सदरील MOOC ला MAHA SARC ची मान्यता घेण्यासाठी महाज्ञानदीपद्वारे विकसित करण्यात आलेल्या LOCF (Learning Outcome-based Curriculum Framework) ला मान्यता.<br>20. "शिक्षकांसाठी ए.आय" (AI for Teachers) सदरील MOOC ला MAHA SARC ची मान्यता घेण्यासाठी महाज्ञानदीपद्वारे विकसित करण्यात आलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | | LOCF (Learning Outcome-based Curriculum Framework) ला मान्यता.<br>विद्याशाखा परिषदेने मान्य केलेल्या वरील सर्व ठरावांना तसेच इतिवृत्तातील अन्य विषयांना विद्वत परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| 70.4.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय** |
| | 70.4.1<br>मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा | **मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेची बैठक मंगळवार दि. 20 जानेवारी, 2026 रोजी आयोजित करण्यात आली होती. विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर सादर...**<br>**टिपणी** — मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेची बैठक मंगळवार, दि. 20 जानेवारी, 2026 रोजी आयोजित करण्यात आली होती. विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर सादर ...<br><br>**ठराव** — मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा संचालकांनी विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त सादर केले.<br>1. सर्व पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांसाठी श्रेणी सुधार नियमांचा माहितीपुस्तिकेत उल्लेख करण्यास मान्यता<br>2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० नुसार विकसित करण्यात येणाऱ्या बी.ए. मराठी (UGG05), बी.ए. हिंदी (UGG06) आणि बी.ए. उर्दू (UGG08) शिक्षणक्रमांतील आधुनिक भारतीय भाषा (MIL) अंतर्गत अभ्यासक्रमांकरिता प्रत्येकी ०२ श्रेयांकांच्या पाठ्यक्रमास त्याचप्रमाणे या पुस्तकांचे लेखक आणि संपादकांच्या नावांस मान्यता<br>3. एम.ए. अर्थशास्त्र पदव्युत्तर पदवी (M50) शिक्षणक्रमातील 'संशोधन पद्धती' अभ्यासक्रमाच्या ०४ श्रेयांकांच्या पाठ्यक्रमास सर्वानुमते मान्यता<br>4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० नुसार सुरू असलेल्या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या शिक्षणक्रम सल्लागार समिती आणि लेखक व संपादकांच्या नावांना कार्योत्तर मान्यता<br>5. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरू असलेल्या एम.ए. इंग्रजी (M87), जनसंज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या (M.A.M.C.J.) (M90) (मराठी आणि इंग्रजी माध्यम), एम.ए. राज्यशास्त्र (M88) (मराठी आणि इंग्रजी माध्यम), एम. ए. समाजशास्त्र (M86) (मराठी आणि इंग्रजी माध्यम) आणि एम.ए. मानसशास्त्र (M89) (इंग्रजी माध्यम) शिक्षणक्रमांच्या अध्ययन साहित्याचे अंशतः लेखन आणि संपादन करणाऱ्या विद्याशाखेतील तसेच इतर लेखक आणि संपादकांच्या नावांना कार्योत्तर मान्यता<br>6. विद्यापीठ अनुदान आयोग-दूरशिक्षण मंडळ नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार (एम.ए.) मानसशास्त्र पदव्युत्तर पदवी आणि (बी.ए.) मानसशास्त्र (विशेषस्तर) पदवी शिक्षणक्रम बंद करण्याचा निर्णयास मान्यता देण्यात आली. तसेच जून २०२५ पासून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासकेंद्रांवर प्रात्यक्षिक आणि तात्विक अभ्यासक्रम ऑनलाईन माध्यमातून नियमित वर्ग घेऊन हायब्रीड पद्धतीने शिक्षणक्रम पूर्ण करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | 7. यापूर्वी सुरू असलेल्या (बी.ए.) मानसशास्त्र पदवी शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना (G01) विशेष स्तरावर न देता द्वितीय आणि तृतीय वर्षात इतर विषयांसह मानसशास्त्र हा विषय घेवून सामान्य स्तरावरील बी.ए. मानसशास्त्र शिक्षणक्रमाची पदवी देण्यास मान्यता<br>8. 'मानसिक प्रथमोपचार प्रमाणपत्र शिक्षणक्रम' या विद्याशाखेमार्फत ऑफलाइन आणि महाज्ञानदीपच्या माध्यमातून ऑनलाईन स्वरुपात विकसित करण्यास तसेच शिक्षणक्रम सल्लागार समितीस आणि विकसित पाठ्यक्रमास, अध्ययन साहित्य विकसित करण्याकरिता निश्चित लेखक, संपादकांच्या नावांना, त्याचप्रमाणे सदर शिक्षणक्रम विकसित करण्यास येणाऱ्या अंदाजे रू. १,३७,२००/- इतक्या खर्चास सर्वानुमते मान्यता<br>9. 'मानसशास्त्रीय समुपदेशन पदविका शिक्षणक्रमाच्या विकासना-करिता अपेक्षित अंदाजे रू. १०,९७,६००/- इतक्या खर्चास मान्यता<br>10. 'ज्ञानगंगोत्री' त्रैमासिकाच्या लेखकांचे कालानुरूप मानधन रू. ५००/- वरून रु. १०००/- इतके वाढविण्यास मान्यता<br>11. पीएच.डी. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थीनी श्रीमती रूपाली प्रशिल पाटील यांच्या प्रबंध मूल्यमापनास मान्यता<br>12. 'भाषा, साहित्य व संस्कृती अभ्यास' विद्याशाखेच्या निर्मितीनंतर मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, पाली आणि इतर भाषा विषयक शिक्षणक्रम 'भाषा, साहित्य व संस्कृती अभ्यास' वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर निरंतर विद्याशाखेतील परकीय भाषांचे शिक्षणक्रमही वर्ग करण्याबाबत सुचना करण्यात आली.<br>13. विद्याशाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या जानेवारी २०२६च्या माहितीपुस्तिकांना मान्यता<br>विद्याशाखा परिषदेतील सर्व विषयांना मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 70.4.2<br>नोंदणी कक्ष | **तनुजा गुरुआरतीताई टेंभुरकर या विद्यार्थिनीचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तिचा बी.ए. शिक्षणक्रमाचा प्रवेश नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव मा. विद्वत परिषदेसमोर सादर...**<br><br>**टिपणी** — तनुजा गुरुआरतीताई टेंभुरकर या विद्यार्थिनीने 2019-20मध्ये पूर्वतयारीला प्रवेश घेतला होता. परंतु कोविड-19च्या प्रादुर्भावामुळे त्यावेळी पूर्वतयारीच्या परीक्षा न झाल्याने अशा विद्यार्थ्यांना पूर्वतयारी उत्तीर्ण न होताही प्रथम वर्षासाठी तात्पुरते प्रवेश देण्यात आले होते. सदर तात्पुरता प्रवेश कायम करण्यास तत्कालीन मा. कुलगुरुंनी मान्यता दिली होती. त्याच आधारे तनुजा गुरुआरतीताई टेंभुरकर या विद्यार्थीनीचा तात्पुरता प्रवेश कायम करण्याचा प्रस्ताव मा. विद्वत परिषदेसमोर सादर...<br><br>**ठराव** — बी.ए. शिक्षणक्रमाची प्रवेशाची पात्रता ही 12 वी पास किंवा पूर्वतयारी पास अशी असताना पूर्वतयारीपूर्वी प्रथम वर्षास प्रवेश कायम करण्याच्या निर्णयासाठी यातील सत्यता पडताळणी करणे आवश्यक आहे. कारण भविष्यातही असे विद्यार्थी पदवीसाठी येऊ शकतात. |

| | | |
|---|---|---|
| | | यासाठी डॉ. जयदीप निकम, डॉ. संजीवनी महाले आणि श्री. नागार्जून वाडेकर या तीन सदस्यीय समितीचे गठण करण्यात आले. समितीने या प्रकरणात छाननी तसेच पडताळणी करून मा. कुलगुरूंना अहवाल सादर करावा.<br>अहवाल मान्य करण्याचे सर्व अधिकार मा. विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. |
| | 70.43<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत देण्यात येणारे पुरस्कार २०२६ पासून सुरु करण्याचा प्रस्ताव मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** – शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील माजी व आजी अध्यापकांनी आणि महाराष्ट्रातील इतर शिक्षक प्रशिक्षकांनी आणि विद्यापीठाने जमा केलेल्या १० लाख रकमेतून पुढील पुरस्कार देण्यात येणार आहे.<br>डॉ.एम.बी.बुच कृतज्ञता पुरस्कार (निवृत्त शिक्षक प्रशिक्षकांसाठी वय वर्ष ६० / ६२ / ६५ / ७०), डॉ. रवींद्र दावे प्रेरणा पुरस्कार (४० वर्षांच्या आतील शिक्षक प्रशिक्षक), डॉ. आनंद वास्कर उत्कृष्ठ ग्रंथ पुरस्कार (शिक्षणशास्त्रात भरीव योगदान देणारा ग्रंथ) असे तीन पुरस्कार सन २०२६ या वर्षापासून कार्यान्वित करून पुरस्कार देण्याचा प्रस्ताव मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत दिले जाणारे डॉ.एम.बी.बुच कृतज्ञता पुरस्कार, डॉ. रवींद्र दावे प्रेरणा पुरस्कार, डॉ. आनंद वास्कर उत्कृष्ठ ग्रंथ पुरस्कार असे तीन पुरस्कार २०२६ या वर्षापासून देण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | | **मा. अध्यक्षांच्या मान्यतेने सभा समाप्त करण्यात आली.** |

**अध्यक्ष**
**विद्वत परिषद**

**सदस्य सचिव**
**विद्वत परिषद**